# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती - ‘ज्ञान दिवस’




## व्याख्यान

## “डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सेक्युलॅरिझम”

### वक्ते: मधु कांबळे

ज्येष्ठ पत्रकार, लेखक, माजी सहसंपादक – दै. लोकसत्ता

गुरुवार दि. १६ एप्रिल २०२६, दुपारी ३.०० वाजता

स्थळ: सेमिनार हॉल ११९

### प्रशिक्षण व आस्थापना विभाग

## सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय, अंधेरी (प), मुंबई-५८

भारतीय विद्या भवनचे

# सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय

भवन्स कॅम्पस, मुन्शी नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५८.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त व्याख्यान

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त, आपल्या महाविद्यालयाच्या **प्रशिक्षण व आस्थापना विभागाने** व्याख्यान आयोजित केलेले आहे.

**विषय: डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सेक्युलॅरिझम**
**वक्ते: श्री. मधु कांबळे (जेष्ठ पत्रकार, लेखक)**
**वेळ: गुरुवार, दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता,**
**स्थळ: सेमिनार हॉल ११९**

**श्री. मधु कांबळे यांचा अल्प परिचय**

- ज्येष्ठ पत्रकार, मुंबई. १९९१ ते २०२४ – ३३ वर्षे पूर्णवेळ पत्रकारिता.
- २० वर्षे दैनिक सकाळमध्ये उपसंपादक, वरिष्ठ उपसंपादक... राजकीय प्रतिनिधी म्हणून कार्यरत.
- १३ वर्षे दैनिक लोकसत्तामध्ये सहसंपादक, राजकीय पत्रकारिता. सामाजिक, राजकीय प्रश्नांवर लेखन.
- दैनिक लोकसत्ता मधून सहसंपादक म्हणून सेवानिवृत्त..

**प्राप्त पुरस्कार**

१. सन २०००... मुंबई मराठी पत्रकार संघाचा कॉ. तु. कृ. सरमळकर स्मृती पुरस्कार (मुंबई )
२. सन २०१९ ...राज्य शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मूकनायक पत्रकारिता पुरस्कार (दिल्ली )
३. सन २०२४ ... ज्येष्ठ स्वातयंत्र्य सैनिक व पत्रकार दिनू रणदिवे स्मृती पुरस्कार (मुंबई ) ... आणि इतर...

**प्रकाशित पुस्तके**

१. **समतेशी करार (२०२१)**: वर्तमान राजकीय, सामाजिक प्रश्नांचा वेध आणि पर्यायी व्यवस्था निर्मितीची मांडणी करणारे पुस्तक
२. **जाती मोजायच्या की गाडायच्या? (२०२५)**: जातिनिहाय जनगणनेवर पहिला वैचारिक हल्ला करणारे पुस्तक.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** यांनी भारताच्या लोकशाही व्यवस्थेत *धर्मनिरपेक्षतेला (**Secularism**)* अत्यंत महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. त्यांनी धर्मनिरपेक्षतेचा अर्थ फक्त "सर्व धर्मांना समान वागणूक" एवढाच मर्यादित ठेवला नाही, तर **व्यक्तीला आपल्या श्रद्धेनुसार धर्म स्वीकारण्याचे, आचरण करण्याचे आणि प्रसार करण्याचे स्वातंत्र्य** असावे, यावर भर दिला. भारतीय राज्यघटनेतील **मूलभूत अधिकारांमध्ये** (विशेषतः कलम २५ ते २८) या तत्त्वांचा स्पष्ट उल्लेख आढळतो. त्यांच्या विचारांनुसार, धर्म हा व्यक्तीचा खाजगी विषय आहे, आणि राज्याने धर्माच्या आधारावर कोणताही भेदभाव करू नये. समाजात **समानता, बंधुता आणि न्याय** प्रस्थापित करण्यासाठी धर्मनिरपेक्षता आवश्यक आहे, असे ते मानत होते. डॉ. आंबेडकर यांनी असा धर्मनिरपेक्ष भारत घडवण्याचा प्रयत्न केला, जिथे प्रत्येक नागरिकाला **धर्म, जात किंवा पंथ यांच्यापलीकडे समान हक्क आणि सन्मान** मिळेल.

डॉ. आंबेडकर यांच्या विचारांची महाराष्ट्राच्या बदलत्या सामाजिक आणि राजकीय परिस्थितीत समर्पकता समजून घेण्याच्या हेतूने सदर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी आपल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित रहावे.

**प्रा. डॉ. मोहन मुरुडी**
**प्र. प्राचार्य**

**दि. ९ एप्रिल २०२६**